बुधवार, २२ जून २०१६

लोकशाही वार्ता

# उर्व्हिला खटी यांची भंडाऱ्यातील गुडरी गावाला भेट

लोकशाही वार्ता/नागपूर

मॉईलच्या विकास कार्यक्रम क्षेत्रात येणाऱ्या २१ खेड्यांना स्टील मंत्रालयाच्या सहसचिव उर्व्हिला खटी यांनी भंडारा जिल्ह्यातील गुडरी गावाला भेट दिली.

ग्रामीण भागात गरीब जनतेला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विकासात्मक कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र इंस्टिट्यूट टू रूरल एरिआ आणि बीएआयएफच्या



सहकार्याने प्रत्यक्ष डोंगरीबुजर्ग, चिखला, मनसर आणि भरावेली या विभागात २१ खेडी असलेल्या विकास करण्याचा उद्देश आहे. स्थानिकांचा वेळेचा सदुपयोग करून नैसर्गिक संसाधने, जमिनीचे स्थायी व्यवस्थापन, गुरेढोरे, पाणी आणि व्यवस्थापन यांचा मॉईलने सतत प्रसार केला आहे. यावेळी खटी यांनी गांडूळखत, बायोगॅस, पशुधन विकास याबाबत लोकांशी संवाद साधला. तसेच योजनेविषयी बचत गट सदस्यांना माहीती दिली. तसेच खाते कशी सांभाळावी याविषयी मार्गदर्शन केले.